SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR- 416004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, B.Sc./M.Sc Exam Section
- Phone No-0231-2609118/9074 www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416004, महाराष्ट्र
बी एस्सी/एमएस्सी परीक्षा
थेट संपर्क क्र. ०२३१-२६०९११८/९०७४ www.unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

जा.क्र. शिवाजी वि/बी.एस्सी/एम.एस्सी परीक्षा/ ए.एस.ए/१४. दिनांक : ०१-१०-२०२५

## अत्यंत महत्वाचे व कालमर्यादीत

प्रति,

१. मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नीत महाविद्यालये
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

२. मा. अधिविभागप्रमुख/संचालक
पदवी व पदव्युत्तर अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय :- विशेष प्रवेश संधी अंतर्गतच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरण्याबाबत.
संदर्भ :- अभ्यास मंडळ विभागाचे परिपत्रक संदर्भ/जा.क्र./शिवाजी वि/अ.मं./५२७, दिनांक २०-९-२०२४. (सोबत प्रत जोडली आहे.)

महोदय/महोदया,

अभ्यास मंडळे विभागाचे उपरोक्त संदर्भीय परिपत्रक जा.क्र. शिवाजी वि/अ.मं./५२७, दिनांक २०-९-२०२४ अन्वये खालील बाबी विचारात घेउन विशेष प्रवेश संधी बाबतची कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे, यामध्ये

**४. या अभ्यासक्रमांना प्रवेशासंदर्भात संबंधित शिखर संस्थेचे विशिष्ट असे नियम असल्यास ते नियम बंधनकारक राहतील.**

**५. ज्या अभ्यासक्रमास पुनरपरीक्षा आयोजित करण्याबाबतची तरतूद करण्यात आलेली आहे, अशा अभ्यासक्रमांच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील वर्षामध्ये प्रवेशा संदर्भात विशेष संधी (Carry on) ची सुविधा देण्यात येऊ नये.**

अ. **विशेष प्रवेश संधी (Carry on) नुसार प्रवेश देताना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदयातील तरतुदी, विद्यापीठाचे अंमलात असणारे दंडक, नियम व अटी बंधनकारक राहतील**

ब. **विशेष प्रवेश संधी (Carry on) संबंधी आवश्यक त्या बाबींची पूर्तता होत असल्याबाबतची खात्री करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्राचार्य/अधिविभागप्रमुख यांची राहील.**

क. सदर बाबींची खात्री करुनच संबंधित विद्यार्थ्यांना विशेष प्रवेश संधी **(Carry on)** देण्यात यावी असे कळविण्यात आलेले आहे.

Scanned with OKEN Scanner

या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, यापूर्वी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अनुत्तीर्ण वर्ष/सत्र परीक्षा अर्ज यापूर्वीच भरलेले आहेत. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांना विहीत वेळेत तात्पुरता प्रवेश देण्यात आला आहे आणि सदरचे विद्यार्थी विद्यापीठ कायद्यातील तरतुदी, विद्यापीठाचे अंमलात असणारे दंडक, नियम व अटी, शासन निर्णय आणि संबंधीत अभ्यासक्रमाच्या शिखर संस्थांनी निश्चित केलेले नियम व अटी यांची पूर्तता करीत असतील अशाच विशेष प्रवेश संधी दिलेल्या विद्यार्थ्यांचे पुढील सत्राचे (उदा. तीन, पाच, सात) अर्ज भरण्याची सुविधा विद्यापीठाच्या संबंधीत परीक्षा विभागामध्ये दिनांक ४ आणि ५ ऑक्टोबर, २०२४ रोजी कार्यालयीन उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदरच्या विशेष प्रवेश संधी अंतर्गत च्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज सादर करतांना परीक्षा अर्ज भरावयाचे विद्यार्थी उपरोक्त नमूद परिपत्रकातील सर्व बाबींची पूर्तता करीत असल्याचे खात्री करुन तसे प्रमाणपत्र संबंधीत महाविद्यालय/अधिविभाग मा. प्राचार्य/ संचालक/विभागप्रमुख यांनी सादर करणे बंधनकारक आहे.

त्याचबरोबर सदरचे परीक्षा अर्ज संबंधीत परीक्षा विभागामार्फत संगणक प्रणालीत समाविष्ठ केल्यानंतर संबंधीत विद्यार्थ्यांची परीक्षा फी त्याच दिवशी विद्यापीठामध्ये जमा करणे आवश्यक आहे. **तसेच दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४. पासून हिवाळी सत्र परीक्षा प्रारंभ होत असल्यामुळे सदर परीक्षा अर्ज भरण्यासाठी मुदत वाढ देणे शक्य होणार नाही, त्यामुळे दिनांक ४ व ५ ऑक्टोबर, २०२४ रोजी सदरच्या पात्र विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज, परीक्षा शुल्कासह सादर करण्याबाबत आपल्या महाविद्यालय/विभागातील संबंधीतांना सूचीत करण्यात यावे. विशेष प्रवेश संधी दिलेल्या विद्यार्थ्यांचे पुढील सत्राचे परीक्षा अर्ज भरण्याबाबतचे संदर्भ क्र. शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/६६८, दिनांक २५-९-२०२४ चे पत्र रद्द समजण्यात यावे विहीत मुदतीनंतर कोणताही परीक्षा अर्ज स्विकारला जाणार नाही याची नोंद घ्यावी**

सदरच्या परीपत्रकामध्ये निर्णयाची अंमलबजावणी बाबत " ५ ब " मध्ये नमुद केल्यानुसार विशेष प्रवेश संधी (Carry on) संबंधी आवश्यक त्या बाबींची पूर्तता होत असल्याबाबतची खात्री करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्राचार्य/अधिविभागप्रमुख यांची राहील यांची आहे याची कृपया नोंद घेवून उचित कार्यवाही करण्यात यावी ही विनंती.

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति
१ अभ्यास मंडळ विभाग
२. सर्व विभागप्रमुख, परीक्षा विभाग
३ समन्वयक, आय.टी. सेल
४ जमा व स्विकृती विभाग
५ दूरस्थ व ऑनलाईन विभाग
६ वेब मास्टर - प्रसिध्दीकरीता
७ जन संपर्क कार्यालय

Scanned with OKEN Scanner